IMPACT FACTS VOL- 7 ISSUE- 4 15 JULY - 14 OCT. 2022 ISSN 2454-8332

# ओबीसी आरक्षण एक राजकिय विश्लेषण

**प्रा.डॉ.डोंगरे एल.बी.**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय,
हिमायतनगर, जि. नांदेड (महाराष्ट्र)

समाजातील शोषीत, दुर्बल, मागासलेल्या वर्गासाठी आरक्षणाची तरतुद घटनेत ३३२-३३६ - ३४०- ३४३ कलमामध्ये करण्यात आली. घटनेतील कलम १४,१५,१६,१७,१८ मध्ये समानतेच्या आधारावर सर्वांना समान संधीला अधिकार देण्यात आला पण जो वर्ग समाजाच्या मुख्य धारेपासून वंचीत आहे अविकसित आहे. त्याचा विकास करण्यासाठी त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी काही सवलती देण्यात आल्या, समाजातील विषमता नष्ट झाली की आरक्षण आपोआपच नष्ट होईल. घटनेल्या कलम १३ मध्ये सर्वोच्य न्यायालयास तो अधिकार देण्यात आलेला आहे. सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात कोणत्याच प्रकारचा विकास न झालेला वर्ग जो शतकानुशतके दुर्लक्षीत राहुन शोषन अत्याचाराचा बळी ठरलेला पुर्णपणे विकासापासून वंचीत असलेल्या मागास वर्ग राष्ट्रीय जीवनाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर मागासवर्गीय आयोगाची निर्मीती करण्यात आली. ३० जाने १९५३ रोजी काळा कालेलकर यांच्या अध्यक्षतेखाली या आयोगाची निर्मीती झाली. या समितीने १९५५ ला आपला अहवाल सादर केला २३९९ जातीना शासकिय सेवेमध्ये आरक्षण देण्याची शिफारस केली होती. तसे १९७८ ला मंडळ आयोग. बी. पी.मंडल यांच्या अध्यक्षतेखाली जनता सरकारने स्थापीत केला. या आयोगाने ३४७३ जातीचा मागासवर्गात समावेश करून २७% आरक्षणाची शिफारस केली. १९८० ला व्ही. पी. सिंग यांच्या नेतृत्वाखाली OBC आरक्षण ऑगस्ट १९९० मध्ये लागु केले या कायद्यास संपुर्ण देशातुन विरोध झाला. त्यामुळे उच्च न्यायालयाचे न्यायाधिश रामप्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली एक समीती स्थापीत केली या समितीने OBC जातींना क्रिमीलीअर नॉनक्रिमीलर गटामध्ये विभाजित केले.

१९६३ मध्ये बालाजी विरुद्ध म्हैसुर राज्य खटल्यामध्ये सर्वोच्य न्यायालयाने ५०% पेक्षा जास्त आरक्षणाची सिमा निर्धारित करण्यात आली होती. इंदिरासाहनी विरुद्ध भारत संघ खटल्यामध्ये सर्वोच्य न्यायालयाने पुन्हा ५०% आरक्षण सिमा निधीरीत केली. त्यामुळे OBC २७% आरक्षणाचा

१९६३ मध्ये बालाजी विरुद्ध म्हैसुर राज्य खटल्यामध्ये सर्वोच्य न्यायालयाने ५०% पेक्षा जास्त आरक्षणाची सिमा निर्धारित करण्यात आली होती. इंदिरासाहनी विरुद्ध भारत संघ खटल्यामध्ये सर्वोच्य न्यायालयाने पुन्हा ५०% आरक्षण सिमा निर्धारीत केली. त्यामुळे OBC २७% आरक्षणाचा गोंधळ निर्माण झाला. परिस्थीतीनुसार शोषित पिडीत व्यक्तिना आपले हक्क मिळविता यावेत या करिता राज्यघटनेत घटना दुरूस्त्या करण्यात आल्या, ०१, ०७, ०८, २१, २२, २३, ५१, ५३, ५७, ६२, ७६, ७७, ८१, ८३, ८४, ८५, १०२, १०३, ध्या सर्व घटना दुरूस्त्या अनुसुचीत जाती- जमाती, मागासवर्ग अल्पसंख्यांकाच्या अधिकाराच्या संरक्षणासाठी करण्यात आल्या.

७९ व्या घटना दुरुस्तीने ३३४ कलमामध्ये अनुसुचीत जातीचे जमातीचे आरक्षण ६० वर्षानी वाढविले. २०१० पर्यत त्याला मुदतवाढ दिली जाते. २०२० मध्ये मोंदी सरकारने कायदा करून २०३० पर्यंत राजकीय आरक्षणाचा कालावधी वाढविला आहे. घटना त्यांनी सुरुवातीला केवळ १० वर्षाकरिता आरक्षणाची व्यवस्था केली होती, ती आज सुवर्ण महोत्सवीवर्षात देखील कायम आहे. कारण लाखो वर्षापासून जो शोषीत झालेला समाज आहे तो केवळ १० वर्षात कसा पुर्ण विकसित होणार त्याला कांही कालखंड जाणारच आहे. मागास कुटुंबालाच आरक्षणाचा लाभ मिळाला पाहीजेत यासाठी २०१८ मध्ये केंद्रसरकारने १०२ घटनादुरूस्ती भारत सरकारने केली यानुसार प्रत्येक घटक राज्य सरकारला OBC आरक्षणासाठी NCBC ची मान्यता घेणे बंधनकारक केले.

सर्व घट राज्यांना मागासवर्गाबाबत आरक्षण धोरण राबविल्यासाठी BSP सरकारने पून्हा १२७ वे घटना दुरुस्ती विधेयक संसदेमध्ये मांडले. ३८५ मतांनी या विधेयकास पास करण्यात आले या विरोधात एकही मत पडले नाही.

कलम ३४२ (A) मध्ये व्यापक प्रमाणात बदल करण्यात आले. ३४२ (A) नुसार The President may with respect to Any State or Union territory and where is a there by Public notification specify The socially and Educationally backward this constitution be depend to socially and educationally backward Classed in relation to that state or Union territory as the case may be for the word The socially and educationally backward classed which shall for the purposes of this constitution the word The socially and educationally backward classed in the m----list which shall for the purposes of the central Government shall be substituted.

कलम ३४२-A(२) नुसार Parliament may by include in or exclude from the centralist of socially and educationally backward classes specified in a notification issued under clause (१) any socially and educationally backward class but save as aforesaid a notification Issued under The said clause shall not be varied by any subsequent notification Exp. For the supposes of clauses (२) the expression central list means the list of socially and educationally backward classes prepend and maintained by and for the central government.

३४२-A(३) नुसार Not with standing any thing contained in clauses (१) and (२) every state or Union Territory may by law prepare and maintain frits own purposes socially and educationally backward classed entries central list

भारतीय राज्यघटनेच्या कलम ३३८ (B) (९) नुसार कायदा करून यादी बनविल्या जाईल.

कलम ३६६ नुसार २६ (C) Socially and educationally backward classes means such backward classed as are so deimed under Art. ३४२ (A) for the purposes of the Central Government or the state or union territory as the case may be.

१२७ व्या घटना दुरूस्ती विधेयकामुळे राज्यघटनेमध्ये १०५ वी घटना दुरूस्ती झाली. ज्यामुळे राज्यांना लोकसंख्येच्या प्रमाणानुसार OBC जातींची यादी तयार करून त्यांना आरक्षण देण्यात यावे. प्रस्तुत शोध निबंधात देशातील मागासजातीच्या लोकसंख्येचा विचार करता सामाजिक, शैक्षणिक आर्थीक मागासलेपणाची स्थीती लक्षात घेता सामाजिक न्यायाच्या प्रस्थापणेसाठी आरक्षण योग्यच आहे. यावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. यामध्ये भारतीय आरक्षणाचा इतिहास, विविध आयोग, घटनात्मक तरतुदी, मागासजातीची लोकसंख्या, त्यांचे मागासलेपण इत्यादी बाबीवर दृष्टीक्षेप टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**संशोधनाची गृहितकृत्य :-**

१) इ.मा.व आरक्षणाची घटनात्मक आरक्षणे असल्याचे दिसून येते.

२) इ.मा.व राजकिय आरक्षणाबाबत सरकारची उदासिनता दिसुन येते.

३) इ.मा.व. आरक्षणाबाबत राजकिय पक्ष श्रेयवादात राजकारण करतांना दिसून येतात.

४) इ.मा.व. आरक्षणाबाबत इ.मा.व समाज जागरुक असल्याचे दिसून येत नाही.

**संशोधनाची उदिष्टये:-**

१) OBC आरक्षणाचा इतिहास जाणून घेणे.

२) सामाजिक राजकिय क्षेत्रातील OBC आरक्षण चळवळींचा आढावा घेणे.

३) OBC आरक्षणा बदल राजकिय पक्षाला हेतु जाणून घेणे.

४) OBC आरक्षणा बाबत इ.मा.व. जागरुकता अभ्यासणे

**काक कालेलकर आयोग:-**

भारतात अनुसुचीत जाती आणि जमाती प्रमाणेच इतरही काही वंचीत मागासलेल्या जाती आहेत त्यांना न्याय, हक्क देण्यासाठी कलम ३५० नुसार १९५३ ला श्री. काकासाहेब कालेलकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोग स्थापीत करण्यात आला त्यांनी आपला अहवाल सादर केला. १९७५ पर्यंत ह्या शिफारशी कोणत्याच सरकारने लागु केल्या नाही. सर्वोच्च न्यायालयाने या बाबत काही शिफारशी केल्या.

१) ज्या जाती सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला आहेत त्यांचा समावेश मागासलेल्या जातीमध्ये करावा.

२) तसे करतांना त्यांच्या आर्थिक परिस्थीतीचा विचार करावा.

३) असा विचार करतांना धर्म, जाती, भाषा, वंश इत्यादीचा विचार करू नये.

४) त्यांच्य विकासाकरिता घटनाकारांनी विशेष सवलती निर्माण करण्यात हरकत नसावी परंतु त्यामुळे अनुसुचीत जाती-जमातींच्या घटनात्मक सवलतींवर अन्याय होणार नाही याची जाणीव ठेवावी. सध्या देशात ०८ लाख रु खालील उत्पन्न असणाऱ्या कुटुंबास OBC आरक्षण देण्यात येते

**मंडल आयोग:-**

मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वाखाली जनता पक्षाचे सरकार इ.स. १९७६ मध्ये बनले त्यांना आपल्या जाहीरणाम्यामध्ये मागासवर्गीयांच्या अडचणी दुर करण्यासाठी आरक्षण देण्याचे कलम ठेवले होते. त्याची अंमलबजावणी करण्यासाठी इ.स. १९७८ मध्ये श्री. बी.पी.मंडेल यांच्या अध्यक्षतेखाली मागासवर्गीय करून ५२ % लोकसंख्येच्या आधारावर आरक्षण जाहीर केले.

१) नौकऱ्या आणि तांत्रीक व्यवसायिक संस्थामध्ये मागासवर्गीमांसाठी २७% जागा राखून ठेवण्यात.

२) गुणवतेच्या आधारे निवडलेला मागासवर्गीयांचा आदरभाव राखीव जागांच्या कोटयात करू नये.

३) पदोनतीसाठी ही आरक्षण ठेवावे.

४) रिक्त राखीव जागा तीन वर्षासाठी पुढे न्याव्यात.

५) अनुसूचित जाती-जमातीप्रमाणेच ह्या नाही वयोमर्यादेची अट शिथील करून घ्यावी.

६) विविध पदासाठी रोस्टर पद्धती लागु करावी.

७) केद्र आणि राज्य सरकारातील सर्वच सार्वजनिक जागांसाठी तसेच सरकारकडुन आर्थिक मदत प्राप्त करण्याच्या सर्वच उद्योगधंदे आणि संस्थामधून इतर मागासवर्गीयांसाठी जागा राखून ठेवाव्यात.

८) इतर मागासवगीयांची संख्या जास्त असलेल्या भागात प्रौढ शिक्षण सुरू करावे त्यांचे साठी खास वर्ग चालवावेत आणि त्यासाठी निवासी शाळा व निशुल्क वस्तीगृहे काढावीत.

९) ग्रामीण व्यवसायिकांना आर्थिक मदत व तांत्रिक शिक्षण देण्याची व्यवस्था करावी. ग्रामीण व कुटीर उद्योगांना आर्थिक मदत द्यावी.

१०) जमीन धारणेत मुलभुत फेररचना करावी.

११) केंद्रात आणि प्रत्येक घटक राज्यात मागासवर्गीयांसाठी विकास महामंडळ निर्माण करून त्यावर सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक उपाययोजनाच्या अंमलबजावणीचे कार्य सोपवावे

१२) संपुर्ण किंवा जास्तीत जास्त इ.मागासवर्गीय एकाच मतदार संघात येतील अशा रितीने मतदार संघाची फेररचना करण्यात यावी.

**मंडल आयोगावर टिका :-**

१) मागासलेपणासाठी जातीच्या निकष लावणे चुकीचे आहे.

२) आयोगाने राखीव जागा मान्य करून समतेच्या तत्वांच्या भंग केला आहे. परंतु ही टिका भ्रममुलक दिसुन येते. कारण भारतीय समाजातील विषमता नष्ट करून समता निर्माण करण्यासाठी गरीबी गरिब आशिक्षीत वर्गाला वरिष्ट वर्गाबरोबर आणण्यासाठी त्यांना सवलती देऊन त्यांच्या बरोबरीला आणता येते तेंव्हाच समानता निर्माण होईल.

३) प्रशासनाची गुणवत्ता व कार्यक्षमता कमी होण्याची भीती आहे. परंतु प्रशासनाला आपले मानून कार्य केले तर भिती दुर होऊ शकते.

**आरक्षणाचे प्रकार:-**

भारतीय राज्यघटनेमध्ये तिन प्रकारचे आरक्षण आहे शैक्षणिक, राजकिय आणि प्रशासकिय सेवेत आरक्षण घटनेच्या कलम ३३४ मध्ये याचे वर्णन करण्यात आलेले आहे. यामध्ये राजकिय आरक्षण केवळ दहा वर्षाची मुदत ठेवलेली होती. ती दर दहा वर्षांनी वाढविण्यात आलेली आहे. २०२० च्या कायद्याने २०३० पर्यंत राजकिय आरक्षणाची मुद्दत BJP सरकारने वाढविली आहे. राजकिय आरक्षण सुरूवातीला दहा वर्षाची मुद्त ठेवण्यात आलेली होती. परंतु प्रस्थापित राजकिय पक्षांनी आणि राज्यकर्त्यांनी मागासवर्गीयांची मत मिळविण्यासाठी हि मुद्त वेळोवेळी वाढवली.

राज्यसभा आणि विधान परिषदेमध्ये राजकिय आरक्षण नाही स्थानिक स्वराज्य संस्था व महिलांनाही राजकिय आरक्षणाची व्यवस्था करण्यात आली होती. विधानसभा आणि लोकसभा जाती जमातींना राजकिय आरक्षण आहे तर इमाव स्थानिक स्वराज्य संस्थेत २७% आरक्षण होते ते आता रद्द झाले आहे.

**आंदोलन - संघर्ष :-**

व्ही. पी. सिंह यांच्या कार्यामुळे १९९० ला देशात मंडळ आयोग लागु करण्यात आला त्यानंतर १९९४ मध्ये महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या आधिनियम १९६१ मध्ये देखील दुरूस्ती करण्यात आली. कलम १२ (२) C- समाविष्ट करण्यात आले त्यानुसार मागासवर्गीयांना २७% जागा राखीव ठेवणे बंधनकारक करण्यात आले.

SC व ST प्रवर्गाचे आरक्षण हे घटनात्मक आहे तर OBC चे राजकिय आरक्षण हे राज्याला विधीमंडळाने दिलेले वैधानिक आरक्षण आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिलेला आहे. संपूर्ण देशात या विरोधात OBC आरक्षणाचा लढा चालु आहे.

OBC प्रवर्गाला २७% आरक्षण दिल्याने घटनेतील ५०% आरक्षणाची मर्यादा राखावी जात नसल्यामुळे विकास कृष्णराव गवळी यांनी सुप्रीम कोर्टात याचीका दाखल केली या खटल्यावर ४ मार्च २०२१ रोजी सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला.

सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णया विरोधात महाराष्ट्र सरकारने पुनरविचार याचीका दाखल केली. मात्र पुनरविचार याचीका देखील २९ में २०२१रोजी सर्वोचा न्यायालयाने फेटाळली आणि ४ मार्च २०२१ रोजीया निर्णय कायम ठेवत OBC चे महाराष्ट्रातील अतिरीक्त आरक्षण संपुष्टात

आणले. स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये OBC, SC,ST मिळुन ५०% हुन अधिक आरक्षण देता येणार नाही असा निर्णय देऊन इमाव चे राजकिय आरक्षण रद्द करण्यात आले.

**महात्मा फुले समता परिषदेचा संघर्ष:-**

इतर मागासवर्गीयांच्या समाजाच्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी अनुसुचीत जाती-जमाती सारखे घटनात्मक आरक्षण देण्यात यावे. तसेच पुढील कालखंडात होणाऱ्या जनगणनेमध्ये OBC जाती आधारित जनगणना करण्यात यावी. यासाठी महात्मा फुले समता परिषद्च्या राष्ट्रीय कार्यकारणीमध्ये करण्यात आली.

नवी दिलीतील महाराष्ट्र सदन या ठिकाणी समता परिषदेच्या राष्ट्रीय कार्यकारणीची बैठक झ ाली. महाराष्ट्र राज्याने अन्न व नागरीपुरवठा मंत्री छगन भुजबळ माजी खासदार सैनिक, भुवनेश्वर मेहता यांच्या समवेत राजस्थान, मध्यप्रदेश, बिहार उत्तरप्रदेश इत्यादी राज्यातुन OBC चे अनेक नेते या परिषदेला उपस्थित होते. इतर मागासवर्गीयाने राजकिय आरक्षण पुर्ववत करावे यासाठी केंद्र शासनसने इम्पीरिअल डाटा राज्यांना द्यावा एक मुखाने निवेदन करण्यात आले OBC आरक्षण संदर्भात अनेक मागण्या या ठिकाणी करण्यात आल्या.

१९३१ पर्यंत जातिनीहाय जनगणना झाली होती याचा त्यांनी दाखला दिला.

**OBC आरक्षणा सहित:-**

**स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका:-**

५०% पेक्षा आधिक आरक्षणाचे प्रमाण स्थनिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकामध्ये वाढल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने OBC आरक्षण न देता निवडणुका घ्याव्यात असा निर्णय दिलेला होता. या निर्णया विरोधात मध्यप्रदेशातील शिवराजसिंह सरकाने याचीका दाखल केली या याचीकेवर विचार करून सर्वोच्च न्यायालयाने OBC आरक्षणाच्या धोरणाला दिलासा देणारा निर्णय देऊन ५०% पेक्षा अधिक आरक्षण जाऊ नये, असे आदेश दिले. मध्यप्रदेश सरकारची मागणी होती ही OBC लोकसंख्या ही ५७% आहे. त्यानुसार त्यांना आरक्षण आधिक मिळायला हवे, यासाठी मध्यप्रदेश सरकारने OBC आरक्षण १४% जाहिर केले.

**निष्कर्ष:-**

१) समाजातील मागास असलेल्या जातींला प्रगत समाज जीवनाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी OBC आरक्षण लागु करणे आवश्यक आहे.

२) OBC आरक्षणातुन मागास जातींना राजकिय सत्तेत सहभागी करून घेणे त्यामुळे मागास जातींना नेतृत्व करण्याची संधी मिळाली

३) OBC आरक्षणामुळे मागास जातीवरील होणारा अन्याय दुर होऊन सामाजिक न्यायाची स्थापना होईल.

४) EBC-०१ वर्षासाठीची मर्यादा वाढविणे. तसेच त्याचे योग्य निकष ठेवणे SC-ST च्या आरक्षण पातळीवर OBC ला न्याय देणे काळाची गरज आहे.

५) जाती-जमाती बरोबर OBC नाही राजकिय आरक्षण देण्यात यावे.

**संदर्भग्रंथ सुची:-**


१) कुश्यप सुभाष हमारा संविधान नेशनल बुक ट्रस्ट, इंडिया, १९९६, नई दिल्ली,

२) सिंगारे अनिल, घुले विठ्ठल- महाराष्ट्रातील आंबेडकर चळवळीला इतिहास अरुणा प्रकाशन लातुर, २००९,

३) पाटिल बी. बी - राज्यशास्त्र, फडके प्रकाशन कोल्हापुर, २००७

४) घांगरेकर चितामन गणेश - भारतीय राज्यघटना स्वराज्य आणि राजकारण श्री मंगेश प्रकाशन,नागपूर

५) सकाळ वृत्तपत्र

६) लोकसत्ता वृत्तपत्र

७) योजना मासिक

८) द हिंदु वृत्तपत्र